
# Review of Research

**International Online Multidisciplinary Journal**

ISSN : 2249-894X Impact Factor 3.1402 (UIF) Volume -5 | Issue - 6 | March - 2016


## ऐतिहासिक व धार्मिक पर्यटनाच्या उद्देशाने बसवधर्म- एक दृष्टिक्षेप




**माने ए.एस**

सहयोगी प्राध्यापक , इतिहास विभाग प्रमुख ,

श्री संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा, जि.सोलापूर.


**प्रस्तावना:**

इ.स.१२ वे शतक हे महाराष्ट्राच्या नव्हेतर भारताच्या इतिहासात अनेक दृष्टीने महत्वाचे होते. कारण आंदोलनाच्या दृष्टीने हे शतक महत्वाचे आहे. त्याच प्रमाणे हे शतक अनेक स्थित्यंतराचे प्रतीक असल्याचे दिसते. बसव धर्म हा फक्त लिंगायतधर्मियांच्या पुरताच सीमीत नसून संपुर्ण मानव जातीच्या कल्याणाकरिता उभारलेले ते क्रांतीकारी आंदोलन होते. बाराव्या शतकात समाजातील टोकाच्या विषमता परिस्थितीचा नाश करून समाजात समानता प्रस्थापित करण्याकरिता बसवेश्वरांच्या नेतृत्वात शरण-शरणींनी प्राण पणास लावलेल्या या कार्यासाठी त्यांनी केलेले जनपर आंदोलन फक्त कर्नाटकाच्या नहे, तर संपूर्ण देशाच्या इतिहासातील एक वैशिष्टयपुर्ण घटना होया. म. बसवेश्वरांनी समाजातील सर्वच क्षेत्रात अर्थात नैतिक, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, साहित्यीक, अध्यात्मिक, पर्यटन अशा सर्वच क्षेत्रात अमूलाग्र बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला. १३ व्या शतकातील त्यांचे क्रांतीकारी विचार आजच्या २१ व्या शतकातही प्रासंगीक असल्याचे दिसतात.

महाराष्ट्र शासनाने २००३ मध्ये म. बसवेश्वरांची जयंती शासनामार्फत साजरी करण्याबाबत आदेश काढला. या कारणे सर्वांचीच जिज्ञासा जागृत झाली आहे. बसवेश्वरांची तत्वे व त्यांचे जीवन चरित्र जाणण्याकरिता त्यांच्या

**साहित्याची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. बसवपुर्व काळात कर्नाटकाची सामान्य जनता राजसत्ता, धर्मसत्ता आणि पुरुष सतेच्या कचाटयात सापडली होती, दुर्बलजनांचे शोषण करत उच्च वर्गातील लोक आपले ऐषोआरामी जीवन जगत होते. त्या दुर्लक्षीतसमाजासाठी बसवेश्वरांनी आयुष्यभर प्रयन केले.**

## उद्दिष्टये:

1. **महात्मा बसवेश्वर चे सामाजिक कार्य जाणून घेणे.**
2. **धार्मिक पर्यटनाच्या माध्यमातून महात्मा बसवेश्वरांचे कार्य सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणे.**
3. **महात्मा बसवेश्वर यांची धार्मिक संकल्पना जाणून घेणे व त्यावर प्रकाश टाकणे.**
4. **बसवेश्वराचे धार्मिक पर्यटनाच्या दृष्टिने केलेले धार्मिक व सामाजिक कार्य**

**शालीवाहन शकाच्या सात ते आठ शतकाच्या प्रारंभी कल्याण कलचुरी घराण्याचा राजा शिजल याने मंगळवेढा नगरीवर बरीच वर्षे राज्य केले. त्यावेळी मंगळवेढा परगणा हा बिज्जल राजाच्या अधिपत्याखाली होता. त्याच्या राजवटीत मंगळवेढा ही राजधानी होती. त्रिजल हा अतिशय हुशार राजकारणी धुरंधर होता. त्याने आपल्या राज्याच्या दक्षिणोत्तर विस्तार केला. बिज्जल राजाचा प्रधान बसवेश्वर हा अति चाक्षाण, हुशारहोता. तो वेदशास्त्रात, धर्नुविदयेत व अनेक कलेत पारंगत होता. गोरगरीब जनतेच्या सुख दु:खासाठी रात्रंदिन सतर्क राहत असे. त्याच्या कारकीर्दीत मंगळवेढयात घरीच शिवमंदिरे बांधली असावीत. जवळच रेवणसिध्देश्वराचे अती जुनाट भुयारी मंदिराचा जिर्णोध्दार बसवेश्वरांनी केला असावा. बसवेश्वर हे परम विभक्त होतेसध्या कैकाडी बावी शेजारील जटा शंकर मंदिर त्यांच्याच कारकिर्दीत झाले असावेतेथे अतिउंच असा टेहाळणी बुरुज होता.**

## मंगळवेढ्यातील धार्मिक कार्य व पर्यटनास चालना:

**मंगळवेढ्यात अतिशय देखणी व सुंदर अशी बारा ज्योतिर्लिंग मंडीत महादेवाची पिंड होती. बसवेश्वरांनी जीणोध्दार करुन ती पिंडकोणी स्थापन केली, त्याच्या पूर्वइतिहासावरून तिचे रामलिंगअसे नामाभिदान करण्यात आले. मंगळवेढयाच्या थोड्याच अंतरावर माळावर एकविरादेवीचे जुनाट मंदिर आहे. त्याचाही जिर्णोध्दार बसवेश्वरांनी केला असावा. राजा बिज्जलने ३१ वर्षे राज्य या मंगळवेढया परगण्यावर केले. बसवेश्वर हे लिंगायतआदयप्रवर्तक होते. त्यांनी मंगळवेढयातुनच लिगायत धर्माची स्थापना करून मुहूर्तमेढ रोवली. ३ वर्षे ते इथेच प्रधानपद भुषणून धर्मप्रचारार्थ त्यांनी श्रवणबेळगाव, बसवकल्याण इत्यादी कर्नाटक प्रांतात लिगायत धर्माची विजयी धर्म पताका फडकावली.**

**सध्या पर्यटनाच्या उद्देशाने पाहिल्यास मंगळवेढ्यामध्ये बसवेश्वरांचे भव्य स्मारक उभे करण्याचे शासनाचे नियोजन आहे. त्यादृष्टीने पाऊले उचलली जात आहेत. त्यामुळे मंगळवेढ्यामध्ये धार्मिक पर्यटनास मोठ्याप्रमाणात चालना मिळत आहे.**

## लिंगायत धर्माचे जनक बसवेश्वर

**बसवेश्वर हेच लिगायत धर्माचे जनक आहेत. विसाव्या शतकातील अनेक श्रेष्ठ साहित्यीकांनी बसवेश्वरच धर्मसंस्थापक आहेत असे आपल्याला ग्रंथात प्रतिपादन केले आहे. शिवाय लोकगीत साहित्यातही असेच दिसून येते. प्राचीन कन्नड साहित्यातील श्रेष्ठ कवींनी म्हणजेच हरीहर, चामरस, पल्कुरीके सोमनाथ, भीमकची, पाडदार देव आदींनी धर्मगुरु बसवेश्वरच होत असे नमूद केले आहे. नंतरचे येडेयूर सिध्दलिंगेश्वर, षण्मुख शिवयोगी आदी शिवयोगनी बसवेश्वर धर्मगुरु आहेत असे आपल्या वचनातुन स्पष्ट केले आहे. बसवेश्वरांच्या साहित्यांचा व ताडपत्रांचे संकलन व त्यासंदर्भात संग्रहालयांमधून पर्यटकांना पाहण्यास उपलब्ध करून दिल्यास पर्यटन विकासास चालना मिळून बसवधर्माची मुळ संकल्पना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचण्यासही मदत होईल.**

**निष्कर्ष :**

**बसवेश्वरांनी समाजातील अनिष्ट प्रथांना विरोध केला. पुनर्विवाह, आंतरजातीय विवाह करण्यास जातीप्रथा मोडण्यास यांनी प्रोत्साहन दिले. समाजातील अन्याय व अत्याचार यास विरोध करण्याचा प्रयत्न केला. लिगायत धर्माची स्थापना बसवेश्वरांनी स्थापना केली. बसवेश्वरांनी कर्नाटकमध्ये तसेच महाराष्ट्र व इतर राज्यामध्ये समाज सुधारणेचे कार्य केले. वंदनीय बसवेश्वरांची समाधी कृष्णा, मलप्रभा व घटप्रभा या नदयांच्या संगमावर आहे. सध्या तेथे धरण बांधल्यामुळे जो जलाशय निर्माण झाला त्यास बसवसागर जलाशय असे म्हणतात. या सर्व कार्यांची माहिती पर्यटनाच्या माध्यमातून उपलब्ध करून दिल्यास पर्यटन व्यवसासाय चालना मिळेल व बसवेश्वरांच्या कार्याबाबतही माहिती मिळेल.**

**संदर्भग्रंथ :**

१) **आपली संस्कृती - समाजसुधारक महामंत्री महात्मा बसवेश्वर (चरित्र) मंगळवेढा भुमी संतांची (मंगळवेढा साप्ताहिक) इ. पुस्तकातून माहिती जमा केली.**

२) **गोपाळ देशमुख, सोलापूरचा जिल्हयाचा इतिहास (मराठा कालखंड) भाग १, रेणू प्रकाशन, पंढरपूर, २००९**

३) **कामत अशोकमहात्मा बसवेश्वर सत्संग प्रतिष्ठान, पुणे, १९९९**